# जाहिर सूचना

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्लॉट क्र. जी. ९, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१, वेबसाइट : www.mahadiscom.in

---

कळवा उप विभागासहित ठाणे - II शहर विभागातील भारनियमन रद्द करण्यासाठी विश्वसनियता शुल्क म्हणून अतिरिक्त पुरवठा आकार निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (महावितरणने) दाखल केलेल्या याचिकेवरील सूचना / अभिप्राय / हरकती.

**(प्रकरण क्र. ८९/२००९)**

१) मा. आयोगाने दि. ३० नोव्हेंबर २००९ रोजीच्या आदेशान्वये (प्रकरण क्र. ३१/२००९) कळवा उपविभाग वगळून ठाणे शहर मंडळाकरिता १ डिसेंबर २००९ ते ३० नोव्हें. २०१० या कलावधी दरम्यान भारनियमन रद्द करण्याकरिता २८ पैसे प्रती युनिट विश्वासनियता शुल्क आकारण्यास मान्यता दिली. महावितरणने ठाणे- II विभागाची पुनर्रचना करताना कळवा उपविभागाचा समावेश त्यामध्ये केला आहे.

२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (महावितरणने) विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२ (३), (४), ८६ (१) (ब) व ९४ (२) अनुसार कळवा उप विभागासहित ठाणे - II शहर विभागाचे भारनियमन रद्द करण्यासाठी विश्वसनियता शुल्क म्हणून अतिरिक्त पुरवठा आकार निश्चित करण्यासाठी २४ डिसेंबर २००९ रोजी याचिका सादर केली होती.

३) भारनियमन रद्द करण्याच्या योजनेमध्ये कळवा उपविभागाचा समावेश करण्याबाबत प्रस्तुतची याचिका सादर करण्यात आली आहे. कळवा उप विभागासहित ठाण्याचे सुधारित विश्वसनियता शुल्क आधीच्या मान्यता दिलेल्या प्रति युनिट २८ पैशांच्या तुलनेत प्रति युनिट ४१ पैसे असे येत आहे.

४) मा. आयोगाने याचिका सुनावणीसाठी स्वीकारुन या याचिकेच्या संदर्भात जनतेकडून या जाहिर सूचनेद्वारे सूचना / अभिप्राय / हरकती मागविण्याचे निदेश मा. आयोगाने महावितरण कंपनीला दिले आहेत.

५) लेखी विनंती केल्यास खालील दस्तऐवजांच्या प्रती महावितरण कंपनीच्या पुढे नमुद केलेल्या कार्यालयात, मिळू शकतील.

क) विनंती अर्जाचे तपशिलवार दस्तऐवज **"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित"** या नावाने दर्शनी धनाकर्जाव्दारे / धनादेशाव्दारे / रोखीने २० रुपये भरल्यानंतर खालील कार्यालयांत मिळतील.

| | |
|---|---|
| १) अधिक्षक अभियंता (वीजदर नियामक कक्ष )<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>५ वा मजला, प्रकाशगड, प्लॉट क्र. जी. - ९,<br>वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.<br>एसटीडी कोड : ०२२ दूरध्वनी क्र. २६४७६८४३ (वै.)<br>२६४७४२११ (का)<br>ई. मेल : setrc@mahadiscom.in | २) मुख्य अभियंता (सं. व सु.)<br>मराविविकंम, भांडूप शहर परिमंडळ,<br>विद्युत , १ ला मजला, एशियन पेंट जवळ,<br>लालबहादूर शास्त्री मार्ग, भांडूप, मुंबई ४०००७८.<br>एसटीडी कोड : ०२२ दूरध्वनी क्र.२५६६१८३६ (वै.)<br>२५६६३९८४ (का), फॅक्स क्र. २५६६३९९०<br>ई. मेल : cebhandup@mahadiscom.in |
| ३) अधिक्षक अभियंता (सं व सु.)<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ठाणे मंडळ, नविन प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,<br>पासपोर्ट ऑफिस समोर, वागळे इस्टेट, ठाणे-४००६०४<br>फोन नं.२५८२६६६६ (वै)<br>२५८३२४८०(का)२५८२९१५४(का)<br>ई. मेल : sethane@mahadiscom.in | ४) कार्यकारी अभियंता (सं. व सु.)<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ठाणे - I विभाग , नविन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पासपोर्ट ऑफिस समोर, वागळे इस्टेट, ठाणे-४००६०४ फोन नं.२५८२६६०४(वै)२५८२६९११ (का)<br>ई. मेल : eekalwa@ho.mahadiscom.in |

| | |
|---|---|
| ५) कार्यकारी अभियंता (सं. व सु.)<br>ठाणे -II विभाग , नविन प्रशासकीय इमारत,<br>३ रा मजला, पासपोर्ट ऑफिस समोर, वागळे इस्टेट,<br>ठाणे-४००६०४ फोन नं. २५८२४७६८ (वै)<br>२५८२४८६६ (का)<br>ई. मेल : sethane@ho.mahadiscom.in | ६) उप कार्यकारी अभियंता, कळवा उप विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>छत्रपती शिवाजी हॉस्पिटल परिसर,<br>ठाणे - बेलापूर रोड, कळवा-४००६०५.<br>फोन नं. २५३६२६९५ (का)<br>ई. मेल : sdo4261@ho.mahadiscom.in |

६) उक्त अर्जासंबंधी जनतेने आपल्या सूचना / अभिप्राय / हरकती सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०००५. फॅक्स क्र. २२१६३९७६ ई. मेल : mercindia@ mercindia.org.in या पत्यावर गुरुवार दि. ११ फेब्रुवारी २०१० पर्यंत पाठवाव्यात. या सोबत सूचना / अभिप्राय / हरकती अधिक्षक अभियंता (वीजदर नियामक कक्ष), मराविविकंम, यांना पाठविल्याचा पुरावा जोडण्यात यावा.

७) सूचना / अभिप्राय / हरकती दाखल करु इच्छिणा-या प्रत्येक व्यक्तीने इंग्रजी किंवा मराठी भाषेतील सहा प्रती, त्यावर प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता, असल्यास ई-मेल पत्ता यांसहीत पाठवाव्यात. एखाद्या ग्राहक संघटनेच्या वतीने किंवा ग्राहक वर्गवारीच्यावतीने हरकती दाखल करण्यात येत असल्यास तेही नमूद करावे. अशा व्यक्तीस मा. आयोगाकडून खाली नमूद केलेल्या ठिकाणी घेण्यात येणाऱ्या सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात येईल व त्याकरिता निराळी सूचना दिली जाणार नाही.

| **सार्वजनिक सुनावणीचे स्थळ** | **वेळ** | **सुनावणीची तारीख** |
|---|---|---|
| **जिल्हाधिकारी कार्यालय यांचे सभागृह,<br>५ वा मजला, कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम)** | **११.००<br>वाजता** | **गुरुवार<br>दिनांक १८ फेब्रुवारी २०१०** |

८) गुरुवार दिनांक ११ फेब्रुवारी २०१० पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक सुचना / हरकती / अभिप्राय यांना महावितरण कंपनीकडून तीन दिवसात परंतु बुधवार दि. १७ फेब्रुवारी २०१० पर्यंत उत्तरे देण्यात येतील. कंपनीतर्फे देण्यात आलेल्या उत्तरांवर आक्षेपक त्यांची प्रत्युत्तरे सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशिरा गुरुवार दिनांक २५ फेब्रुवारी २०१० पर्यंत दाखल करु शकतात.

९) याचिकेची तपशीलवार कागदपत्रे महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. तसेच मा. आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत स्थळावरुन डाऊन लोड करुन घेण्याच्या स्वरुपात विनामूल्य उपलब्ध आहेत.

**कार्यकारी संचालक (वाणिज्य)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**

तारीखः २१ जानेवारी, २०१०
ठिकाणः मुंबई.